**टिपणी**

दुरध्वनी क्रमांक २५५३७८६६
फॅक्स क्रमांक २५५३९३४८
**e-mail - adarshgaon@yahoo.in**

जा.क्र./मृद-५/आगास/संकेतस्थळ/माहिती/**६२**/२०१८
आदर्शगांव, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन,
कृ.आ.,म.रा.,शिवाजीनगर,पुणे-५ **दिनांक : ८/१/२०१८**

**विषय –** कृषि व पदुम विभाग व अधिनस्त कार्यालयाच्या संकेतस्थळावरील माहिती अद्यावत करणेबाबत...

**संदर्भ -** १) आपले कार्यालयाचे पत्र जाक्र/कृआ/संप्र/सेब/अनुपालन/१५७/१७ दि.११.१०.२०१७
२) या कार्यालयाचे पत्र जाक्र/मृद-५/आगास/संकेतस्थळ/मा/८२९/१७ दि.१६.१०.२०१७
३) आपले कार्यालयाचे पत्र जाक्र/०३/१८ दिनांक ४.१.२०१८

उपरोक्त विषयान्वये कृषि व पदुम विभाग व अधिनस्त कार्यालयाच्या संकेतस्थळावरील माहिती अद्यावत करणेबाबत दिलेल्या पत्रातील प्रपत्रात आदर्शगाव संकल्प व प्रकल्प योजनेची संक्षिप्त माहिती संदर्भ क्र.२ अन्वये आपले कार्यालयास कळविण्यात आली आहे.

संदर्भ क्र.३ अन्वये पुनश्चः माहिती मागविण्यात आली आहे. त्यानुसार पुनश्चः माहिती सोबत सादर करण्यात येत आहे. आपले माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव सविनय सादर.

# परिशिष्ट – आदर्शगाव संकल्प व प्रकल्प (मृद-५) योजनेची माहिती

| अक्र | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| १ | योजनेचे नाव | आदर्शगाव संकल्प व प्रकल्प योजना |
| २ | योजनेचा कोड क्रमांक | - |
| ३ | शासन निर्णय क्रमांक | आगायो-२०१३/प्र.क्र.१६२/जल-८ दि.१० मार्च,२०१५ |
| ४ | योजनेचा प्रकार | राज्य योजना |
| ५ | राज्य विभाग | राज्य हिस्सा १०० टक्के (मृद व जलसंधारण विभाग) |
| ६ | तपशिल | योजनेची उद्दिष्टे-<br>● . लोकसहभागातून ग्रामविकास व त्यासाठी लोक कार्यक्रमात शासनाचा सहभाग.<br>● सत्तेचे विकेंद्रीकरण, गावांचा सर्वकष व सर्वांगीण विकास<br>● सप्तसूत्रीची अंमलबजावणी (नसबंदी, नशाबंदी, कु-हाडबंदी, चराईबंदी आणि श्रमदान लोटाबंदी व बोअरवेल बंदी) |
| ७ | प्रक्रिया | कार्यप्रणाली –<br>❖ गांव निवडीच्या निकषात बसणा-या गावांची निवड.<br>❖ प्रकल्प कार्यान्वयन संस्था निवडीच्या निकषानुसार निवड.<br>❖ अंमलबजावणी तथा सनियंत्रणासाठी विविध स्तरावर समित्यांची रचना<br>(ग्राम, जिल्हा, राज्यस्तर).<br>❖ सविस्तर प्रकल्प आराखडयानूसार सर्व कामे प्रकल्प कार्यान्वयन संस्थांच्या माध्यमातून करणे.<br>❖ गाभा व बिगरगाभा क्षेत्रातील कामे, उपजिवीका उपक्रम तसेच कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स्यव्यवसाय, शिक्षण, क्रिडा, आरोग्य, समाजकल्याण इ. विभागांच्या विविध विभागांच्या योजनांची सांगड.<br>कार्यपध्दती - |

| | | |
|---|---|---|
| | | • ग्रामसभेने गावाची व संस्थेची निवड करण्याचा प्रस्ताव देणे (ग्रामसभा)<br>• प्रशिक्षण (राज्य स्तरीय प्रशिक्षण संस्था)<br>• सविस्तर प्रकल्प आराखडा (प्रकल्प कार्यान्वयन अभिकरण)<br>• कामांची सविस्तर अंदाजपत्रके तयार करणे (प्रकल्प कार्यान्वयन अभिकरण)<br>• कामांना तांत्रीक मान्यता (संबंधित यंत्रणा) तसेच प्रशासकीय मान्यता (जिल्हा स्तरीय समिती) प्रदान करणे<br>• खर्चाचा वार्षिक कृती आराखडा (प्रकल्प कार्यान्वयन अभिकरण आणि कार्यकारी समिती)<br>• बाब निहाय, गावनिहाय व काम निहाय निधी वितरण (राज्य कार्यकारी समिती)<br>• गावात गाभा, बिगर गाभा आणि तत्सम विकास कामे करणे (प्रकल्प कार्यान्वयन अभिकरण)<br>• केंद्र व राज्य योजनांची सांगड (प्रकल्प कार्यान्वयन अभिकरण)<br>• कामाची तपासणी व मुल्यमापन (संबंधित विभाग व कार्यकारी समिती)<br>• कामाचे हस्तांतरण (प्रकल्प कार्यान्वयन अभिकरण)<br>• संनियंत्रण व प्रगती अहवाल (जिअकृअ व राज्य कार्यकारी समिती)<br>• लेखा परिक्षण (संबंधित संस्था)<br>• सामाजिक लेखाजोखा (प्रकल्प कार्यान्वयन अभिकरण) |
| ८ | लाभार्थी | गाव हा घटक असतो |
| ९ | फायदा | गाव हा घटक मानून गावाचा सर्वांगिण विकास केला जातो. |
| १० | पात्रता | गाव निवडीचे निकष –<br>• गावाचे एकुण क्षेत्रापैकी सर्व प्रकारचे मिळुन ३० टक्केपेक्षा जास्त सिंचन नसावे.<br>• गावाची लोकसंख्या १०००० पेक्षा जास्त नसावी. |

| | | |
|---|---|---|
| | | • गावाचे महसुली क्षेत्र २५०० हेक्टर पर्यंत असावे.<br>• गट ग्रामपंचायत अंतर्गत स्वतंत्र वाडी अथवा वस्तीस सहभागी होता येईल.<br>• ग्रामविकास निधी उभारुन तो चालविण्यासाठी ग्रामस्थांची तयारी आवश्यक.<br>• सप्तसुत्री (नसबंदी, नशाबंदी, चराईबंदी, कु-हाडबंदी, श्रमदान, लोटाबंदी व बोअरवेलबंदी)चे पालन करण्याची ग्रामस्थांची तयारी आवश्यक आहे.<br>• विविध ग्रामअभियानात उदा. संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान, निर्मलग्राम अभियान, तंटामुक्त गावे, संत तुकाराम वन ग्राम योजना पुरस्कार प्राप्त गावे व त्यामध्ये सातत्य.<br><u>प्रकल्प कार्यान्वयन यंत्रणा (संस्था) निवडीचे निकष</u> –<br>• संस्थेची धर्मादाय आयुक्ताकडे नोंदणी झालेली आवश्यक आहे.<br>• संस्थेने मागील तीन वर्षाचे ऑडीट रिपोर्ट सादर करणे आवश्यक आहे.<br>• संस्थेची वार्षिक उलाढाल रक्कम रुपये ३.०० लाखापेक्षा कमी असू नये.<br>• तसेच एखादे गावाचे क्षेत्र १५०० हे. पेक्षा जास्त आणि लोकसंख्या ४००० पेक्षा जास्त असल्यास संस्था निवडीचे निकष वर नमूद केलेल्या अटीसह खालीलप्रमाणे राहतील. (शासन शुध्दीपत्रक दि.२४ मार्च,२०१७) नुसार संस्था वार्षिक उलाढाल रु.१०.०० लाखापेक्षा कमी असू नये.<br>• संस्थेची घटणा सादर करणे, तसेच संस्था फॅमिली ट्रस्ट नसावी.<br>• संस्थेला मृद व जलसंधारण व ग्रामविकास क्षेत्रातील २ ते ३ वर्षाचा कामाचा अनुभव.<br>• संस्थेला लोकसहभाग घेऊन काम करण्याचा अनुभव. |

| | | |
|---|---|---|
| | | • संस्था कोणत्याही कारणामुळे काळया यादीत समाविष्ठ नसावी. |
| ११ | आवश्यक कागदपत्रे | गाव निवडीसाठी ग्रामसभेच्या ठरावानुसार प्रस्ताव |
| १२ | संदर्भिय लिंक | आगायो-२०१३/प्र.क्र.१६२/जल-८ दि.१० मार्च,२०१५ |
| १३ | अर्ज करण्याची पध्दत | केव्हाही |
| १४ | अर्ज स्विकारण्याचा कालावधी | ऑफलाईन |
| १५ | नमुना अर्ज | आगायो-२०१३/प्र.क्र.१६२/जल-८ दि.१० मार्च,२०१५ |
| १६ | सेवा पुरविण्याची कालमर्यादा | ३ वर्ष |
| १७ | नियोजित अर्थसंकल्प | राज्य शासनाने निर्गमित केलेनुसार |
| १८ | भौगोलिक क्षेत्र | संपूर्ण राज्यात कोणत्याही गावात - उपरोक्त गाव निवडीचे निकषाप्रमाणे. |
| १९ | अर्ज सद्यस्थितीचा पाठपुरावा | जिल्हास्तरीय समितीचे मान्यतेने |
| २० | लाभार्थ्यांना अनुदान देण्याची पध्दत | गावासाठी निवडलेल्या प्रकल्प कार्यान्वयन यंत्रणेच्या त्रिसदस्यीय खात्यावर प्रत्यक्षात झालेल्या कामानुसार निधी वर्ग केला जातो. (जिल्हास्तरावरुन) |
| २१ | संपर्क, कार्यालयाचे नाव व पत्ता | कृषि उपसंचालक (मृद-५), आदर्शगाव संकल्प व प्रकल्प, कृषि भवन, १ ला मजला, शिवाजीनगर, पुणे-५ |
| २२ | योजनेची भविष्यातील नियोजन | प्रत्येक पंचवार्षिक मध्ये १०० गावे निवडीचे लक्ष्य पूर्ती करणे. |

**कृषि उपसंचालक (मृद-५),**
आदर्शगाव संकल्प व प्रकल्प,
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे

**प्रति,**

**मा.संचालक (आत्मा),**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५**

**प्रत – यांना माहितीसाठी**

**कृषि उपसंचालक संगणक प्रकल्प,**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५